


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२५ ●शुक्रवार, दि.१४ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# पुण्यात भीषण अपघातात ९ जण जिवंत जळाले; २० ते २५ जण जखमी

**पुण्यातील नवले पूल परिसरात ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने २० ते २५ वाहनांना धडक दिली. या भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. सीएनजी कारला धडक दिल्याने पेट घेतल्याने मागील कंटेनरही पेटला.**

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नवले पूल परिसरात मोठा अपघात झाला आहे. ब्रेक फेल झालेल्या कंटेनरनं २० ते २५ वाहनांना धडक दिली. हा कंटेनर धडका देत भरधाव वेगात निघाला होता. त्याच्यापुढे एक कंटेनर होता. त्या कंटेनरला धडक देण्याआधी ब्रेक फेल झालेल्या कंटेनरनं एका कारला धडक दिली. लहान कार दोन कंटेनरच्या मधोमध अडकली. या कारचा चक्काचूर झाला. सीएनजीवर चालत असलेल्या कारनं पेट घेतला. या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. यातील काही जणांनी प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.



पुण्यातील नवले पूल परिसरात आज संध्याकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला. साताऱ्याहून मुंबईच्या दिशेला निघालेल्या कंटेनरनं अनेक वाहनांना धडक दिली. हा कंटेनर मंद उतारावरुन खाली येत होता. जवळपास २० ते २५ वाहनांना धडक देत तो पुढे गेला. त्यानंतर या कंटेनरनं एका फॅमिली कारला धडक दिली. कंटेनरची धडक बसल्यावर कार अचानक पुढे गेली. कारच्या पुढे दुसरा कंटेनर होता. दोन कंटेनरच्या मध्ये कार अडकली. कारमध्ये सीएनजीचा सिलिंडर होता. दोन कंटेनरच्या मधोमध अडकल्यानं कारचा चेंदामेंदा झाला. सिलिंडरचा स्फोट होताच आग लागली. त्यामुळे मागील कंटेनरदेखील पेटला.

● कात्रज बोगद्यापासून ते नवले पुलापर्यंत तीव्र उतार आहे, त्यामुळे या रस्त्यावर यापूर्वी देखील अनेक अपघात घडलेले आहेत. पुणे महानगरपालिका असेल, नॅशनल हायवे ऑथॉरिटी असेल वेळोवेळी प्रयत्न करतात, ह्या रस्त्यात सुधारणा आणण्यासाठी काम केलं जातय. या रस्त्यावर यापूर्वी अनेक अपघात याच भागात घडले आहेत हेही अगदी खरं आहे. याच परिसरात अनेक अपघातांमध्ये आतापर्यंत निष्पाप लोकांनी आपलं जीव गमावलं आहे. उतारामुळे गाड्यांचा वेग देखील अचानक वाढतो आणि गाड्या कंट्रोल होत नाहीत. या तीव्र उताराबद्दल प्रशासनासोबत आम्ही दुरुस्तीसाठी पत्रव्यवहार करू, असे पुणे वाहतुकीचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी बोलताना म्हटले.

## ● अपघात पाहणाऱ्या प्रत्यक्षदर्शीनं काय सांगितलं ?



नवले पूल भागात राहणाऱ्या व्यक्तीनं ५ वाजून ३५ मिनिटांनी भरधाव वेगानं एक ट्रक आला. एक ट्रक आला त्यानं बऱ्याच वाहनांना मागून ठोकलं होतं. तो ट्रक एका वाहनाला धडकून थांबला होता. त्यानंतर मागून आलेल्या आणखी एका ट्रकनं त्याला धडक दिली. त्यामुळं ट्रकनं पुढच्या वाहनांना पुन्हा धडक दिली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी लौकिक गोळे दिली. कारमधून एका व्यक्ती वाचवण्यासाठी आवाज देत होता, त्याच्या जवळ जाईपर्यंत डिझेलचा टँक फुटला आणि आग लागली, असं या प्रत्यक्षदर्शीनं म्हटलं. प्रत्यक्षदर्शीनं ट्रकनं २० ते २५ वाहनांना धडक दिल्याची माहिती दिली. त्या ट्रकनं एका कारला फरफटत आणलं होतं, असंही प्रत्यक्षदर्शीनं म्हटलं.

# मुख्यमंत्री अन् पालकमंत्र्यांकडून शोक; रोहित पवार म्हणाले, ब्लॅक स्पॉट

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील नवले पुलावर झालेल्या भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी असल्याची माहिती आहे. अपघातानंतर स्थानिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने तो ट्रक इतर वाहनांना घेऊन एका कंटनेवर जाऊन आदळला. त्यामुळे, घटनास्थळी कारमधील सीएनजीचा स्फोट होऊन आग




लागल्याची भीषण दुर्घटना घडली. या घटनेचा व्हिडिओ पाहिल्यानंतर अपघाताची दाहकता लक्षात येते. पोलीस व अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य केले. दरम्यान, या दुर्घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोक व्यक्त केला आहे. तर, आमदार रोहित पवार यांनी शासनाने येथील पुलासंदर्भाने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

पुण्यातील अपघाताच्या घटनेवर नेतेमंडळींकडून शोक व्यक्त केला जात आहे. पुण्यातील नवले पुलाजवळ दोन कंटेनरची झालेली धडक आणि त्यामध्ये एका कारचा झालेला भीषण अपघात तसेच ▶ उर्वरित पान २ वर

# 'महाराज तुम्ही फेटा खाली उतरवायचा नाही'

**इंदुरीकरांचा कीर्तन सोडण्याचे संकेत; राष्ट्रवादीच्या महिला नेत्याची फेसबुक पोस्ट**

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज यांच्या मुलीचा साखरपुडा काही दिवसांपूर्वी मोठ्या थाटामाटात पार पडला. मात्र, यावरुन सोशल मीडियातून झालेल्या व्यक्तिगत टीकांमुळे महाराज व्यथित झाले आहेत. परिणामी त्यांनी थेट कीर्तन सोडण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

इंदोरीकर महाराज काय म्हणाले ?

आमची पोरं लहान असताना आठ-आठ दिवस माझी त्यांच्याशी गाठ नव्हती. आणि आता लोक इतके खाली गेलेत, की माझ्या मुलीच्या अंगात कपडे कसे आहेत, यावरुन



लोकांचे कमेंट्स आहेत. याच्यापेक्षा वाईट काय असेल? आता चार दिवसांपासून माझ्या मुलीच्या अंगातील कपड्यावर लोकांनी बातम्या तयार केल्या, पण तिच्या बापाला... तुम्ही मला घोडे लावा.. माझा पिंड गेलाय... माझ्या मुलाचा आणि मुलीचा काय दोष आहे, असं महाराजांनी एका किर्तनात म्हटलं आहे.

रुपाली ठोंबरे पाटील काय म्हणाल्या ?

याचदरम्यान, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रदेश प्रवक्ता तथा नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी फेसबुकला याबाबत पोस्ट लिहिली आहे. त्यात त्यांनी म्हटलं आहे की, 'इंदुरीकर महाराज राम कृष्ण हरी. तुम्ही फेटा खाली उतरवायचा नाही. महाराज तुम्ही सोशल मीडियाच्या विकृत लोकांमुळे व्यथित झालात, साहजिकच होणार. पण आपण आपल्या कर्तृत्वाने आपल्या, कामाने सिद्ध आहात. या सोशल मीडियाच्या विकृत छपरी जे माणूस नावावर कलंक आहेत, यांच्याकडे अजिबात लक्ष देऊ नये. ▶ उर्वरित पान २ वर

# 'आईकडून सतत दुजाभाव, माझ्या मृत्यूनंतर तिला कडक शिक्षा करा', तरुण वकिलानं राहत्या घरी आयुष्य संपवलं

**सोलापूर । प्रतिनिधी**

शहरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका तरुण वकिलाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल बुधवारी दुपारी घडली. सागर श्रीकांत मंद्रूपकर (वय ३२, रा. समर्थ सोसायटी, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड) असं मृत वकिलाचं नाव आहे. या घटनेनं सोलापूरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. सागर मंद्रूपकर यांनी काल बुधवारी



दुपारी आपल्या घराच्या पहिल्या मजल्यावर दोरीच्या साहाय्याने स्लॅबवरील लोखंडी हुकाला गळफास घेतला. काही वेळानंतर ही घटना घरच्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांना खाली उतरवून ▶ उर्वरित पान २ वर

# भाकरी फिरली ? दोन्ही राष्ट्रवादींच्या युतीवर शिक्कमोर्तब ?

## अजित पवार म्हणाले, 'माझं शरद पवार साहेबांशी...'

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युती आणि आघाडीमधील घटक पक्षांकडून काही ठिकाणी एकत्र तर काही ठिकाणी विभक्त लढणार आहे. असं असतानाच उभी फूट पडलेल्या शिवसेनेचे दोन्ही गट आणि राष्ट्रवादीचेही दोन्ही गट एकमेकांसोबत युती करण्यासंदर्भातील चर्चा आहे. याबद्दल खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांना थेट प्रश्न विचारण्यात आला. बुधवारी पुण्यातील




एका कार्यक्रमानंतर बोलताना पत्रकारांशी संवाद साधला. निवडणुकीसंदर्भातील युतीबद्दल विचारलं असता अजित पवारांनी, मी माझ्या सगळ्या कार्यकर्त्यांना सांगितलं आहे की तुम्हाला तुमच्या भागात जे जे वाटतं जे योग्य वाटत ते त्या ठिकाणी करा, असं उत्तर दिलं.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवणार? दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या युतीसंदर्भात अजित पवारांना प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्र्यांनी संभाव्य युतीची शक्यता पूर्णपणे फेटाळून लावली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही पक्ष युती करणार का? असं विचारण्यात आलं असता अजित पवारांनी, त्यासंदर्भात मी त्या कार्यकर्त्यांना सांगितलं ▶ उर्वरित पान २ वर

# हायकोर्टाचा घटस्फोटीत पतीला दणका; पोटगीची रक्कम ७ पटीने वाढवली, दरमहा ३.५ लाख देण्याचे निर्देश





**मुंबई । प्रतिनिधी**

स्वतःची आर्थिक क्षमता लपवणे आणि कोर्टाची दिशाभूल केल्याने पोटगीच्या रक्कमेत वाढ करण्याचे आदेश उच्च न्यायालयने दिले. त्यामुळे, संबंधित पीडित पत्नीला पोटगीची रक्कम दरमहा ५० हजारांवरुन आता थेट साडेतीन लाखांवर जाऊन पोहोचली आहे. १००० कोटींचं साम्राज्य असताना दर महा ६ लाख रुपयांची मिळकत असल्याचा पतीचा दावा विभक्त पतीने न्यायालयात केला होता. मात्र, हा हास्यास्पद दावा न्यायालयात उघड झाल्याचं निरीक्षण कोर्टाने केलं आहे. न्या.बी.पी कोलबावाला आणि न्या. सोमसेखर सुंदरेसन यांच्या मुंबईतील खंडपीठाने याबाबतचा निर्वाळा दिला आहे. तसेच वर्षभराची थकबाकी म्हणून ४२ लाख रुपये जमा करण्याचे आदेशही विभक्त पतीला दिले आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

# प्रकाश दादा बोगस कामे करुन बिल्ले उखळून खाणाऱ्या नगरसेवकांना पुन्हा उमेदवारी देने म्हणजे बाबा जेवले पत्थर पालथे!

**बोगस कामे केलेले एकदा वार्ड क्रं २ मध्ये येऊन बघा मग उमेदवारी देण्याचा निर्णय घ्या !!**



**माजलगाव । संतोष रासवे**

आपण आणि आपले नेतेच कसे विकासाभिमूख आहोत, विकासाचा टेभा मिरवून घेत आपणालाच कशी विकासाची जाण आहे आणि आपण आणि आपला पक्ष कसा धुतल्या तांदळासारखे आहे हे पटवून देत उमेदवार मतदारांच्या दारोदार फिरताना दिसत आहेत. वास्तविक पहाता एक निवडणूक झाली की दुसरी निवडणूक येईपर्यंत तोंड न दाखवणारे व बोगस कामे करून बिल्ले उखळुन खाणारे माजी नगरसेवक यांना जर प्रकाश दादा उमेदवारी देणार असतील तर शहराचा विकास कसा होईल असा प्रश्न उपस्थित होत आहे. जनहिताचा कितीही कनवळा आणत असले तरी त्यामागे त्यांचाच ▶ उर्वरित पान २ वर

## चपटी, बोटी, लक्ष्मीदर्शन वर मतदान होवू नये !

निवडणुकीच्या तोंडावर प्रकाश दादा सोळंके यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान वायरल झाला असून या व्हिडिओमध्ये प्रकाश सोळंके हे कशी निवडणूक जिंकायची ते कार्यकर्त्यांना सांगतात दारू मटन लक्ष्मी दर्शन देऊन निवडणुका जिंकायच्या असतात असे सगळे देताना हा व्हिडिओ आहे. निवडणुका आल्या की दारु, मटनाचा अक्षरशः महापूर आल्याचे दिसते. एक दिवस उमेदवारांकडून दारु पिली, मटन खाल्ले म्हणजे पुन्हा पाच-दहा वर्षे काही लागणारच नाही असा अर्थ होत नाही आणि ज्यांना चपटी, बोटीवर मतदान केले आहे अशांना विकासाची अपेक्षा करण्याचाही अधिकार शिल्लक राहत नाही. त्यामुळे कोणापुढे लाचार होवून आणि स्वाभिमान गहाण ठेवून चार-दोन दिवस खायला, प्यायला मिळाले म्हणून मतदान विकून लोकशाही भ्रष्ट करणाऱ्या मतदारांनीही सद्सद्विवेकबुद्धी जागेवर ठेवून योग्य उमेदवारांनाच निवडून दिले तर परिसराचा आणि शहराचा विकास होवू शकतो.




# १४ नोव्हेंबर : बालदिन आणि जागतिक मधुमेह दिन – आरोग्यदायी बालपण म्हणजेच सशक्त राष्ट्र

१४ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी आणि जगासाठी दुहेरी अर्थाने विशेष आहे . भारतात हा दिवस पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन म्हणून साजरा केला जातो , आणि त्याच वेळी जगभर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून पाळला जातो . या दोन्ही दिनांच्या संगमातून एक अतिशय महत्त्वाचा संदेश मिळतो – बालपणापासूनच आरोग्याची सवय, म्हणजे मधुमेहमुक्त जीवन.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना मुलं अत्यंत प्रिय होती . ते म्हणायचे, आजची मुलं म्हणजे उद्याचे नागरिक. त्यांच्या मते , मुलांमध्ये असलेली निरागसता , कल्पकता आणि प्रामाणिकपणा हीच देशाच्या भविष्यातील खरी ताकद आहे . म्हणूनच त्यांच्या जन्मदिनी , १४ नोव्हेंबरला भारतात बालदिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली . या दिवशी शाळांमध्ये विविध उपक्रम, नाटिका , खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मुलांच्या शिक्षणाचा, आरोग्याचा आणि हक्कांचा विचार या दिवशी केंद्रस्थानी असतो. परंतु आजचा बालदिन केवळ आनंदाचा दिवस नसून , आत्मपरीक्षणाचाही दिवस आहे – कारण आधुनिक काळातील मुल शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या नव्या आव्हानांना सामोरे जात आहेत .

या निमित्ताने एक गाणं मनात पाझरतं – बच्चे मन के सच्चे, सारी दुनिया के अच्छे , बच्चे हैं भगवान का रूप , बच्चे हैं नूर का धूप . हे गाणं केवळ भावनिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीची आठवण करून



देतं – मुलांमध्ये भविष्यासाठीची बीज असतात, त्यांच आरोग्य , आनंद आणि सुरक्षा हेच आपल्या राष्ट्रनिर्मितीच मूळ आहे .

दुसरीकडे , १४ नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह दिनही आहे. या दिवशी इन्सुलिनचे शोधक डॉ. फ्रेडरिक बँटिंग यांचा जन्म झाला होता . त्यांनी १९२१ मध्ये इन्सुलिनचा शोध लावून जगभरातील लाखो रुग्णांचे प्राण वाचवले . या दिवसाचा उद्देश आहे – मधुमेहाबद्दल जनजागृती , प्रतिबंध आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार . आज भारतात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या अहवालानुसार , भारतात सुमारे १०१ दशलक्ष ( १०.१ कोटी ) लोकांना मधुमेह आहे . म्हणजे जवळपास प्रत्येक दहापैकी एक भारतीय मधुमेहग्रस्त आहे. त्यापैकी सुमारे ६० टक्के लोकांना आपल्या आजाराची कल्पनाच नाही . १९९० मध्ये दर एक लाख लोकांमागे १६२.७४ नवीन रुग्ण होते , तर २०२१ मध्ये हे प्रमाण २६४.५३ वर पोहोचले आहे – जवळपास दुपटीहून अधिक वाढ .

महाराष्ट्रातही ही स्थिती चिंताजनक आहे . शहरी भागात मधुमेहाचे प्रमाण सरासरी १४ ते १५ टक्के आहे , तर ग्रामीण भागात १० ते १२ टक्के . एका आरोग्य सर्वेक्षणानुसार राज्यात २.०२ कोटी लोकांची तपासणी झाली आणि त्यापैकी १०.९ लाखांना




मधुमेह असल्याचे नव्याने निदान झाले . दुसऱ्या अहवालानुसार , सुमारे ६० लाख लोक महाराष्ट्रात मधुमेहग्रस्त आहेत आणि त्यापैकी ७० टक्के लोकांना आपल्या आजाराची माहितीच नाही.

या आकडेवारीकडे पाहता स्पष्ट होते की , मधुमेह हा आता केवळ वयस्क किंवा शहरी लोकांचा आजार राहिलेला नाही . आहारातील बदल, कमी शारीरिक हालचाल , जंक फूडचा अतिरेक , झोपेचा अभाव आणि वाढलेला तणाव यांमुळे मुल, किशोरवयीन तरुण आणि ग्रामीण भागातील नागरिकही मधुमेहाच्या विळख्यात अडकत आहेत.

या पार्श्वभूमीवर बालदिन आणि मधुमेह दिन यांचा एकत्र विचार करणे अत्यावश्यक आहे. बालपणापासूनच जर संतुलित आहार, दररोज खेळण किंवा व्यायाम, तणावमुक्त वातावरण आणि नियमित तपासणी या गोष्टींचा आग्रह धरला, तर मधुमेहासारख्या आजारांच प्रतिबंधात्मक संरक्षण सहज शक्य आहेघरात पौष्टिक अन्न दिलं गेल पाहिजे, शाळांमध्ये क्रीडेला प्रोत्साहन मिळालं पाहिजे , मुलांना निसर्गाशी जोडलं पाहिजे . समाजाने आणि शासनाने मिळून या दिशेने पावलं उचलणं आवश्यक आहे. फिट इंडिया मोव्हमेंट , आयुष्मान भारत आणि पोषण अभियान सारख्या सरकारी उपक्रमांना सामाजिक पाठिंबा मिळणं ही काळाची गरज आहे. या १४ नोव्हेंबरला आपण सर्वांनी ही प्रतिज्ञा घ्यावी – मुलांना जंक फूडपासून दूर ठेवू , रोज त्यांच्यासोबत खेळू , आरोग्यविषयक शिक्षणाला प्राधान्य देऊ आणि समाजात निरोगी जीवनशैलीचा आदर्श निर्माण करू. कारण आरोग्यदायी बालक म्हणजेच निरोगी भारत आणि निरोगी भारतच खऱ्या अर्थाने सक्षम , समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल. १४ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला दोन अमूल्य धडे देतो – एक, बालपण जपा आणि दुसरा, आरोग्याचे रक्षण करा . पंडित नेहरू म्हणायचे , मुलांमध्ये भविष्य पाहा . ते भविष्य उज्वल आणि निरोगी ठेवायच असेल , तर आजपासूनच आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण आवश्यक आहे .

बालपण जर निरोगी असेल, तर राष्ट्र सशक्त होते – आणि सशक्त राष्ट्रच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा अर्थ समजते.

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
**तहसीलदार, बीड**

◆ पान १ वरून पुढे...

## मुख्यमंत्री अन्....

त्यानंतर लागलेली आग ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची बातमी अतिशय वेदनादायी असून मी मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे म्हणत अजित पवार यांनी शोक व्यक्त केला आहे. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहसंवेदना व्यक्त करतो, तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थनाही अजित पवार यांनी केली आहे. यासह आमदार रोहित पवार यांनीही ट्विट करत शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली आहे.

पुण्यातील नवले पुलावर झालेल्या अपघातात काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. या घटनेत प्राण गमावलेल्या व्यक्तींना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, असे ट्विट करत मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच, या अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करुन दिली.

नवले पूल हा ब्लॅक स्पॉट – पुण्यातला नवले पूल हे ठिकाण ब्लॅक स्पॉट बनलं असून इथं आतापर्यंत झालेल्या विविध अपघातात अनेक जणांचे बळी गेले आहेत. आजही झालेल्या विचित्र अपघात ९ हून अधिक जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नवले पुलावर होणारी वाहतूक कोंडी आणि अवजड वाहनांची वाहतूक अत्यंत धोकादायक बनली आहे. इथं वारंवार अपघात होऊनही प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात नाहीत. शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे ट्विट आमदार रोहित पवार यांनी केले आहे.

## 'महाराज तुम्ही...

आपण आपल्या वारकरी प्रबोधनातून, किर्तन आणि भजनातून समाजातील माता, भगिनी, बंधूंसाठी अत्यंत मौल्यवान कार्य केलं आहे. अध्यात्मिक शांती देत आहात. तेही या युगाशी समतोल साधून केलं आहे. त्यामुळे आपण अजिबात व्यथित होऊ नका. तुमच्यासारखे महाराज नसतील घर घरातील बिघडलेले स्त्री, पुरुष चांगल्या मार्गावर येणार कसे, त्यांना सदबुद्धी, चांगले विचार, चांगले कर्माचा रस्ता सांगणार कोण ? तुम्ही फेटा खाली उतरवायचा नाही. तुमच्या सोबत अख्खा महाराष्ट्र आहे. तुमचे

◆ पान १ वरून पुढे...

कुटुंब म्हणून तुमच्या कुटुंबतील मी लेक आहे. आमच्या भगिनींबद्दल कोण बोलत असेल तर त्या वेडी, विकृत माणसावर तुम्ही दुर्लक्ष करा. आम्ही पाहतो त्यांच्याकडे सोशल मीडियावर वेड्याचे सौंग घेण्याकडे त्या वेड्याचे सौंग काढण्याची सुद्धा हिंमत आहेत. त्यांची विकृती ठेचून काढू अजिबात व्यथित होऊ नका आणि फेटा खाली ठेवायचा नाही. ही माझी आपणास लेक म्हणून विनंती आहे. फेटा खाली ठेवायचा नाही,' असं रुपाली पाटील ठोंबरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

## 'आईकडून सतत...

तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. मात्र, तेव्हाच डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचं घोषित केलं. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. घटनास्थळावर पोलिसांना एक सुसाईड नोट मिळाली आहे. त्या चिठ्ठीत सागर यांनी लिहिलं आहे की, 'आईकडून होणाऱ्या सततच्या दुजाभावामुळे मी आत्महत्या करत आहे. माझ्या आत्महत्येला ती जबाबदार आहे. माझ्या मृत्यूनंतर तिला कठोर शिक्षा करा.' या मजकुरावरून कौटुंबिक कारणांमुळे त्यांनी टोकाचं पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी ॲड. सागर मंद्रूपकर यांचा पोलिसांबरोबरही काही वाद झाला होता. हे प्रकरण सोलापूर बार असोसिएशनपर्यंत पोहोचलं होतं. त्या वादामुळे सागर मानसिक ताणाखाली होते का, याबाबत विविध चर्चा सुरू आहेत. पोलिसांनी या सर्व बाबींचा तपास सुरू केला असून आत्महत्येचं नेमकं कारण समोर येणं बाकी आहे. तरुण वकिलाने आत्महत्या केल्याने सोलापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

## भाकरी फिरली...

आहे. आज मला पुण्यातले स्थानिक पदाधिकारी भेटले. दोन्ही शहराध्यक्ष आणि आमदार भेटले. सगळे माजी नगरसेवक पण भेटले. त्यांना मी सांगितलं आहे की तुम्ही चाचणी करा. मी परत दोन दिवसांनी येतो आणि त्याबद्दल निर्णय घेऊ, असं उत्तर दिलं. पुढे बोलताना, अजून महानगरपालिकेचा कार्यक्रम जाहीर झाला नाही त्यामुळे काय काय होतं आणि कसं कसं होतं ते पहावं लागेल, असं अजित पवार म्हणाले.

◆ पान १ वरून पुढे...

त्यावरुनच अंदाज येईल? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात बोलताना अजित पवारांनी, निवडणुका होऊन खूप दिवस झाले आहेत. आज आम्ही महायुतीमध्ये आहोत. महायुतीमध्ये आमचं काम सुरू आहे. पण आता नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका सुरू आहेत. कुठल्या कुठल्या शहरात काय काय घडतं हे साधारणतः लवकर समजेल. त्यावरुनच अंदाज घेता येईल. अंदाज आला की पुढच्या गोष्टी ठरवता येतील, असं सूचक विधान केलं.

युतीबद्दल शरद पवारांशी चर्चा? युतीसंदर्भात काही बोलणं झालं का याबद्दल विचारलं असता अजित पवारांनी, माझं शरद पवार साहेबांशी बोलणं झालेलं नाही. कार्यकर्ते त्यांच्या भावना मांडत असतात. मी सगळ्या भागातल्या सहकाऱ्यांना सांगितलं आहे की तुम्ही चाचणी करा आणि ठरवा, असं उत्तर दिलं. तसेच, मी काही ही पहिली निवडणूक आम्ही लढत नाहीये. आम्ही लोकांनी अशा कित्येक निवडणुका लढल्या आहेत. हे आम्हाला नवीन नाही. आमच्यामध्ये एकोपा राहून निवडणुका लढू, असं अजित पवार म्हणाले.

## हायकोर्टाचा घटस्फोटीत....

पती स्वच्छ मनाने आला नसून त्याने स्वतःला अत्यंत गरीब तसेच मंजूर केलेली मूळ पोटगीची कमी रक्कम देऊ न शकणारा माणूस असल्याचे खोटे दावे न्यायालयात केल्याच निरीक्षण नोंदवण्यात आलं. सन १९९६ साली लग्न झालेल्या जोडप्याचा संसार १६ वर्षे टिकला, त्यानंतर २०१३ मध्ये दोघे विभक्त झाले. पुण्याच्या कौटुंबीक न्यायालयाने त्यांना घटस्फोट देखील मंजूर केला आहे. कौटुंबीक न्यायालयाच्या निकालानंतर महिलेने पोटगीच्या रक्कमते वाढ करण्यासाठी तर विभक्त पतीने पोटगी देण्याची क्षमता नसल्याचा दावा करत पोटगी रद्द करण्याची मागणी केली होती. यासंदर्भात दाखल याचिकेवर अखेर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. एकटीने मुलीचं संगोपन करण्यास अडचणी येत असल्याचा तसेच पती ऐशो–आरामत जगत असल्याचा दावा पत्नीने न्यायालयात केला होता. त्यावर, कोविडनंतर आपले आर्थिक उत्पन्न घटल्याचा आणि आधीच पुरेशी रक्कम पत्नीला दिल्याचा दावा पतीने न्यायालयात केला होता. यावेळी, न्यायालयात पत्नीच्या बाजुने, पुरावे दाखल करण्यात आले. त्यानुसार, उच्च न्यायालयाच्या निर्णयात पतीच्या श्रीमंत जीवनशैलीचे

◆ पान १ वरून पुढे...

दाखले देण्यात आले असून वाढदिवसाच्या पार्टीचे तसेच लक्झरी केंजो टी–शर्ट परिधान केलेल्या फोटोंचा तसेच परदेशी सहली आणि परदेशातील मुलाच्या शिक्षणाचा देखील निर्णयात उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, या सगळ्यात काही चुकीचं नसून शपथ घेऊन खोटं सांगण की मी वर्षागणिक केवळ सहा लाख रुपये कमावतो हे पटत नसल्याचं न्यायालयाने निकालात नमूद केलं आहे.

## प्रकाश दादा....

स्वार्थ दडल्याचे लपून राहत नाही. पाच वर्षे जनतेत मिसळणारे आणि सर्वसामान्यांच्या अडीअडचणींना धावून जाणाऱ्या उमेदवारांनाच मतदारांनी कौल देण्याची गरज आहे. निवडणूक आली की प्रत्येक उमेदवार मी, माझा नेता आणि माझा पक्ष कसा आणि किती चांगले आहोत, आपणालाच विकासाची कशी आणि किती जाण आहे आणि विकास करायचा असेल तर आम्हालाच कसे निवडून देणे हिताचे आहे हे मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. पाच वर्षे बेपत्ता असणारे उमेदवार निवडणूक आली की पावसाळ्यातील छत्र्यांप्रमाणे उगवताना दिसतात. मग पाच वर्षे कोठे काळे तोंड केले होते असा प्रश्न मतदाराने करायला हवा आहे. प्रकाश दादा रस्त्यांसाठी व नाली साठी आणलेले पैसे चांगल्या कामांसाठी आहेत की नगरसेवक गुत्तेदारांना खूश करण्यासाठी ? थुक्याला थुका लावून बोगस कामांचा धुमाकूळ वार्ड क्रमांक दोन सह शहरांमध्ये घातला आहे. पाण्यासारखा पैसा खर्चुनही रस्त्यांची अवस्था जैसे थे प्रकाश दादा तुम्हाला सर्वसामान्य नगरसेवक हवेत की बोगस कामे करूण बिल्ले खाणारी नगरसेवक गुत्तेदार ? असा प्रश्न सामान्य जनतेला पडलेला आहे. प्रकाश दादा सोळके म्हणजे विकासाची जाण असणारे नेते सर्वसामान्यांचे आधारस्तंभ अशा एक नाही तर भारावर विरुदावल्या बोगस कामे करणाऱ्या नगरसेवक गुत्तेदाराने लावण्याचा सपाटा सुरू आहे. तरी शेवटच्या सहा महिन्यांने मतदारसंघात रस्ते नाल्या मंजूर करन घेण्यात आले आहेत. मात्र, त्या मदारांसाठी सोयीचे रस्ते व नाल्याचे काम ते चांगल्या दर्जेदारांकडून करण्याऐवजी ते वार्डातील नगरसेवक गुत्तेदार कडून बोगस कामे केलेली आहेत. आता तरी दादा वेळ अजूनही गेलेली नाही. सुशिक्षित, गोरगरीब, कार्यक्षम, लोकप्रिय उमेदवार द्यावा जेणे करुन शहराचा विकास होईल नसता बाबा जेवले पत्थर पालथे होण्याची वेळ येऊ नये.

◆ पान ४ वरून पुढे...

## अनिलदादा जगताप....

कार्यकर्त्यांचा आहे, अशी भावना घेऊन शिंदे साहेब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांचा रथ पुढे चालवत आहेत. आपल्या सर्व जणांच्या विश्वासाला कदापि तडा जाणार नाही. आपल्या सोबत एकनाथजी शिंदे साहेबांची ताकद आहे आणि मी स्वतः तुमच्या सोबत आहे त्यामुळे किल्ले धारूर नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकविल्याशिवाय राहणार नाही. असे त्यांनी सांगितले तर शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन यांनी सर्वांचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसेना युवासेना शेतकरी सेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेश सोहळ्याचे प्रस्ताविक शिवसेना किल्लेधारूर तालुका प्रतिनिधी नारायण कुरुंद यांनी केले तर सूत्रसंचालन प्रतिक कांबळे यांनी केले.

ओओओओओ दु. २.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे हा प्रवेश सोहळा पडला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपला भाषणात सांगितले की महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या कार्याला प्रभावित होऊन आपण शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहात आपल्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो. उपमुख्यमंत्री नामदार शिंदे साहेब यांचे कार्य अवघ्या महाराष्ट्राने पाहिलेला आहे. यामुळेच महाराष्ट्रातल्या घरात आणि घरातील प्रत्येक मनात शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने आदर सन्मान मिळालेला आहे. शिवसेना पक्ष हा मालक नोकरांचा नसून कार्यकर्त्यांचा आहे, अशी भावना घेऊन शिंदे साहेब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांचा रथ पुढे चालवत आहेत. आपल्या सर्व जणांच्या विश्वासाला कदापि तडा जाणार नाही. आपल्या सोबत एकनाथजी शिंदे साहेबांची ताकद आहे आणि मी स्वतः

◆ पान ४ वरून पुढे...

तुमच्या सोबत आहे त्यामुळे किल्ले धारूर नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकविल्याशिवाय राहणार नाही. असे त्यांनी सांगितले तर शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन यांनी सर्वांचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसेना युवासेना शेतकरी सेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेश सोहळ्याचे प्रस्ताविक शिवसेना किल्लेधारूर तालुका प्रतिनिधी नारायण कुरुंद यांनी केले तर सूत्रसंचालन प्रतिक कांबळे यांनी केले.

## ढेकणमोहा, जरुड...

ज्यामध्ये काळेगाव, आंबेसावळी, कुटेवाडी, भवानवाडी, नाळवंडी, जुजगव्हाण, मानकुरवाडी, निर्मळवाडी, कऱ्हाळवाडी, ढेकणमोहा तांडा, वलीपूर, घाटजवळा, घाटसावळी तांडा येथील प्रवाशांना होईल.. उपरोक्त मागणीचा सकारात्मक विचार करावा ही राज्य परिवहन महामंडळाकडे विनंती शेतकरीपुत्र धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, युवक उपस्थित होते..

## भाजपा ज्येष्ठ ...

देण्याचं काम मदनराव भाऊ चव्हाण यांनी आपल्या संपूर्ण राजकीय व समाज सेवेच्या कार्यकीर्दीत केलेलं आहे तोच वारसा आज सुंदर चव्हाण पुढे सक्षम जपत आहेत,सामान्य लोकांच्या मदतीसाठी रात्री १२ वाजता देखील एका फोनवर सुंदर चव्हाण हे धाऊन येतात,हे पिंपळनेर सर्कल मधील सामान्य जनतेला चांगल माहीत आहे,ते सांगायची गरज नाही,समोरचा कोण आहे काय आहे हे सुंदर चव्हाण कधीच बघत नाहीत हा प्रत्येकाला विश्वास आहे म्हणून लोकांची गर्दी त्याच्याकडे सतत पाहायला मिळत असते त्याच कारण म्हणजे इथे काम मार्गी लागत असत हा विश्वास असतो,मग कोणीही असो आपल्याकडे जो माणूस आला आहे त्याच काम मार्गी लावणे हे सुंदर चव्हाण नेहमी करत असतात, पिंपळनेर सर्कल मध्ये प्रत्येकाला माहीत आहे बीड मध्ये गेल्यावर आपल्या हक्काचा एका फोन वर येणारा माणूस कोण

◆ पान ४ वरून पुढे...

आहे तर सुंदर चव्हाण आहेत हा विश्वास आणि आधार प्रत्येकाच्या मनात कायम आहे,आज पिंपळनेर जिल्हा परिषद गटात निवडणुकीच बिगूल वाजत आहे अनेक जन भावी गावागावात जाऊन भेटी गाठी घेत आहेत निवडणुकीच्या तयारीला वेळ देत आहेत,इथे मात्र सुंदर चव्हाण हे आजही गोरगरीब जनतेच्या कामासाठी त्याच्या समस्यासाठी तहसील कार्यालयात उभे आहेत हा फरक आहे,,म्हणून काम करणारच नाव हे कायम निघत असत हे कोणी नाकारू शकत नाही,पिंपळनेर सर्कलच्या राजकारणातील थोरल घर असणाऱ्या मदनराव चव्हाण यांच्या घरात जर भाजपकडून सुंदर चव्हाण यांना उमेदवारी आली तर यांच्याच भोवती पिंपळनेर सर्कलच राजकारण फिरणार हे नाकारता येत नाही, ही त्यांच्या कामाची साक्ष आहे.

## शितलताई दाभाडे....

जाऊन मतांचा जोगवा मागायला लागले आहेत. कारण त्यांना त्यांचा पराभव दिसू लागला आहे. मतदार राजा मात्र सर्व लक्षात ठेऊन योग्य वेळेला उत्तर देत असतो. याचा प्रत्यय विरोधकांना येत आहे. मतदारांनी कित्येक ठिकाणी त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करुन निरुत्तर केले आहे. मतदार राजाला सर्व समजते त्यामुळे येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पदासहीत सर्व नगरसेवक निवडून देऊन शहराच्या विकासाची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या पल्लवी गोगुले, योगिता तांबारे, किरण दाभाडे, शिला पैठणे, अनिता काळे, निता बेद्रे, संगीता घोडके, प्रिती दाभाडे, सीमा होंडे, सीमा जवंजाळ, प्रणिता रूकर यांच्या सह शेकडो महिला सहभागी आहेत.

## बीड नगराध्यक्षपदासाठी ...

निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असल्याने, आंबेडकरी चळवळीत कार्यरत असलेल्या खऱ्या मागासवर्गीय उमेदवाराला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून संधी मिळेल, अशी अपेक्षा

◆ पान ४ वरून पुढे...

होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ कागदपत्रांवरून अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असलेल्या महिलेला पुढे करून पक्षाने मागासवर्गीय समाजाची फसवणूक केल्याचा आरोप धनवे यांनी केला आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या महिलेला उमेदवारी देऊन मागासवर्गीय समाजाच्या प्रतिनिधित्वाचा अवमान करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. हा प्रकार दलित समाजाचा विश्वासघात असल्याचे सांगत, धनवे यांनी खऱ्या आंबेडकरी चळवळीतील उमेदवाराला न्याय मिळावा, अशी मागणी केली जात आहे. अन्यथा, या अन्यायाचा निषेध म्हणून दलित समाज निवडणुकीत योग्य पक्षाला जागा दाखवून देईल, असा इशाराही त्यांनी पत्रकातून दिला आहे.

## बीड जिल्हा परिषदेच्या...

बांधकाम आणि आरोग्य विभागात प्रकर्षाने दिसत असून, अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी काम करत आहेत. काही विभागप्रमुख थेट सीईओ यांच्या नावावर फाइल पाठवतात, ज्यामुळे सामान्य प्रशासन विभागाची प्रक्रिया पूर्णपणे वगळली जाते. डॉ. ढवळे यांच्या म्हणण्यानुसार सीईओ यांच्या चांगुलपणाचा काही अधिकारी गैरफायदा घेत आहेत. सध्या जिल्हा परिषदेतील १०० हून अधिक कर्मचारी 'अतिरिक्त कामकाज'च्या नावाखाली महत्वाच्या टेबलवर बसले आहेत. या प्रकारामागे हितसंबंध आणि सत्ताधारी गटांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली असून, लवकर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## रा.कॉं.शरदचंद्र...

आहे. केवळ मतापुरता मागासवर्गीय व मुस्लिमांबद्दलचा पुळका दाखवायचा आणि मते मिळवायची हा शरद पवारांच्या पक्षासह नेत्यांचा जुना फंडा झाला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न हाणून पाडावा, असा इशारा समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी दिला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# दर्जेदार विकासकामांनी नाशिक सुंदर, आधुनिक शहर करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुंभमेळ्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन

**नाशिक । प्रतिनिधी**

येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील पाच हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण




मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री ॲड. माणिकाराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची व्यवस्था, सुरक्षा, पर्वस्नान व अमृतस्नानाचे नियोजन आणि या सोहळ्याचा मुळ गाभा असलेल्या आध्यात्मिकतेचा अनुभव भाविकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी नाशिकमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यामतून २० हजार कोटींपेक्षा अधिकची कामे सुरू करण्यात येत आहेत. कुंभमेळ्यापर्यंत ही रक्कम २५ हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या राहतील. शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने कामे केल्याने मोठ्या प्रमाणात कामाला सुरूवात होत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या नागरिकांनीही यासाठी सहकार्य केले आहे, असे त्यांनी सांगितले.

# रुग्णवाहिकेतील ऑक्सिजन सिलेंडरचा भीषण स्फोट, संपूर्ण परिसर हादरला

**गोंदिया । प्रतिनिधी**

ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्रातील दुरुस्तीला आलेली रुग्णवाहिकेने पेट घेतला आहे. रुग्णवाहिकेला दुरुस्ती केंद्राच्या जवळच आग लागली आहे. ऑक्सिजनच्या सिलेंडरच्या झालेल्या स्फोटामुळे स्थानिकांमध्ये मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार-तेढा मार्गावरील मांडोदेवी वर्कशॉप येथे आज दुपारी एक भीषण अपघाताची घटना घडली. प्राथमिक आरोग्य केंद्राची (पीएससी) ॲम्बुलन्स



दुरुस्तीसाठी आणण्यात आली असता अचानक आग लागून ती काही क्षणांत जळून खाक झाली. दरम्यान, ॲम्बुलन्समध्ये ठेवलेला ऑक्सिजन सिलेंडर स्फोट झाल्याने मोठा आवाज होत संपूर्ण मुंडीपार परिसर हादरून गेला. मात्र सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्रचंड मोठ्या या स्फोटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते,सदर ॲम्बुलन्स काही दिवसांपूर्वी बिघाड झाल्याने गोंदिया येथून टोचनद्वारे (टोचन वाहनाने बांधून) मुंडीपार येथील मांडोदेवी वर्कशॉपमध्ये आणण्यात आली होती. गाडी वर्कशॉपच्या परिसरात उभी केल्यानंतर अचानक इंजिनच्या भागातून धूर निघू लागला. काही क्षणातच आग पेट घेतली आणि ती वेगाने गाडीभर पसरली. याचवेळी आत असलेल्या ऑक्सिजन सिलेंडरचा स्फोट झाला.स्फोटाचा आवाज इतका प्रचंड होता की परिसरातील नागरिक बाहेर पडून घटनास्थळी धावले. लगेचच मुंडीपार पोलिस व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. ॲम्बुलन्स पूर्णपणे जळून खाक झाली असून आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे.

# रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे जनजातीय गौरव कार्यक्रम संपन्न

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे शासन निर्देशानुसार भगवान बिरसा मुंडा जन्मशताब्दी वर्षा निमित्त दि.१ नोव्हेंबर,२०२५ ते दि.१५ नोव्हेंबर,२०२५ दरम्यान जनजाती गौरव पंधरवडा साजरा केला जात आहे.या निमित्ताने आज दि.१२ नोव्हेंबर रोजी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे व आदिवासी नृत्याचे आयोजन करण्यात आले होते.यात सर्व इयत्ताच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सुंदर सादरीकरण केले.यावेळी वडगाव आदिवासी वाडीतील ग्रामस्थ,पालक




उपस्थित होते.यावेळी श्री.वैजनाथ जाधव सरांनी वारली चित्रकला विषयी मार्गदर्शन केले.संकेत काठोळे स्वयंसेवक यांने कार्यक्रम संचालन केले. मुख्याध्यापक श्री.सुभाष राठोड सरांनी भारतातील जनजाती विषयी मार्गदर्शन करत त्यांचा संस्कृतीक वारसा मांडला. तसेच भगवान बिरसा मुंडा यांचा अबुआ राज एते जाना, महारानी राज टुंडू जानाब हा नारा व त्यांचा जल जंगल आणि जमीन यासाठीचा संघर्ष विद्यार्थ्यां सांगितला. उत्साही व आनंददायी वातावरणात

**भारतीय स्वातंत्र्य लढा व त्यातील जनजातींचे योगदान पुढील पिढीला माहीत होण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त ठरत आहेत. -सुभाष राठोड मुख्याध्यापक, शाळा वडगाव.**

कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.राजश्री जांभुळकर, अंगणवाडी सेविका नीता राऊत, स्वयंसेवक संकेत काठोळे, संचिता गडगे, शिक्षक वैजनाथ जाधव व मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण 2024' पुरस्कार



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेल्या 'महाराष्ट्र भूषण २०२४' या पुरस्कारासाठी निवड झालेले ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना आज तो प्रदान केला जाणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत शुक्रवार १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी नोएडा, उत्तर प्रदेश येथील त्यांच्या निवासस्थानी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. नोएडा, उत्तर प्रदेश येथील त्यांच्या निवासस्थानी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# पुण्यात बिबट्यांचा उच्छाद! शेतकऱ्यांमध्ये भीती, महिलांचे शेतात गळ्याला पट्टा बांधून काम

## पुणे जिल्ह्यातील काही भागात बिबट्यांच्या दहशतीनं जगणं कठीण झालं आहे. स्थानिक नागरिक भीतीच्या सावटाखाली आहेत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील काही भागात बिबट्यांच्या दहशतीनं जगणं कठीण झालं आहे. स्थानिक नागरिक भीतीच्या सावटाखाली आहेत. जीव मुठीत धरून लोक घराबाहेर पडत आहेत. शेतमजूर महिला तर गळ्याला खिळ्यांचे पट्टे बांधून काम करत आहेत. अत्यंत भयावह परिस्थितीत असलेल्या स्थानिकांनी बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. मात्र अचानक बिबट्यांचे हल्ले का वाढलेत, त्याचा आढावा घेऊयात या रिपोर्टमधून.

गेल्या काही दिवसांपासून उत्तर पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या दहशतीनं प्रचंड भीती पसरली आहे. भरदिवसा हे बिबटे माणसांसह पाळीव प्राण्यांवर हल्ला करू लागले आहेत. पुणे जिल्ह्यातील शिरूर, आंबेगाव, खेडसह जुन्नर या पट्ट्यात बिबट्यांची संख्या




वाढली आहे. थेट मानवी वस्तीत शिरकाव करून बिबटे हल्ले करत असल्यानं नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अचानक बिबट्यांचे हल्ले का वाढलेत असा प्रश्न अनेकांना पडला आहे. तर या परिसरात कुकडी प्रकल्पातील ५ धरणांमुळे बारमाई शेतीसाठी पाणी उपलब्ध असतं. त्यामुळं ऊस शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. परिणामी बिबट्यांना लपण्यासाठी उसाचं क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. तर भक्ष म्हणून शेतकऱ्यांकडून नुकतेच जन्मलेले जर्सी गाईचे गोरे खोड मोकाट सोडले जातात. याचाच भक्ष म्हणून बिबटे उपयोग करतात. एकीकडे दुधाला बाजार भाव नाही तर दुसरीकडे हे खोंड सांभाळून याचा काही उपयोग होत नाही त्यामुळे शेतकरी हे खोंड मोकाट सोडून देत आहेत. गोहत्या बंदीमुळे या गोऱ्यांना कत्तलीसाठी कुणी घेऊन जात नसल्यानं शेतकरी असे मोकाट सोडून देतात. त्यामुळे या परिसरात बिबट्यांची संख्या वाढली असून शासनाने या संदर्भात तातडीनं उपाययोजना करून गोहत्या बंदीसंदर्भातला विचार करून या गोऱ्यांना सांभाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी विनंती शेतकरी आता शासनाकडे करत आहेत. तर शेतकऱ्यांनी असे गोरे मोकाट सोडून देण्याऐवजी वनविभागाशी संपर्क केला तर या गोऱ्यांचा भक्ष्य म्हणून पिंजऱ्यामध्ये ठेवण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो. बिबट्याला पकडण्यासाठी डार्टचे इंजेक्शन देण्यासाठी भक्ष म्हणून या गोऱ्यांचा उपयोग होऊ शकतो असं वनविभागानं म्हटलं आहे.

# साईंच्या दर्शनानंतर दृष्टी, दावा खरा की खोटा?

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डीत साई मंदिरात चमत्कार झाल्याचा दावा करण्यात येत आहे. साईंच्या दर्शनानंतर कमी दृष्टी असलेल्या मुलाला पूर्ण दृष्टी आल्याचा दावा करण्यात आला आहे. शिर्डी साई संस्थानच्या माजी विश्वस्तांनीही हा चमत्कार असल्याचा दावा केला आहे. मात्र हा दावा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अंनिसने या दाव्यावर अनेक प्रश्न उपस्थित करत आव्हान दिलं आहे.

साईनगरी शिर्डी म्हणजे लाखो साईभक्तांचं श्रद्धास्थान... अनेकजण आपल्या मनातील इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला जातात. केवळ राज्यभरातून नाही तर देशभरातून भाविक शिर्डीत येतात. नुकतंच उत्तराखंडमधून एक कुटुंब साईबाबांच्या दर्शनासाठी आलं होतं. त्या कुटुंबानं साई दर्शनानंतर केलेल्या दाव्यानंतर सगळ्यांनाच धक्का बसला. त्या कुटुंबातील १० वर्षीय मुलाची दृष्टी थोडी अंधूक होती.. त्याला




दिसायला थोडं कमी होतं. मात्र साईबाबांच्या दर्शनानंतर दृष्टी परत आल्याचा दावा या मुलाने आणि त्याच्या कुटुंबाने केलाय.. तर साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त सचिन तांबे यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. दृष्टी परत येणाच्या दाव्यावरून मोठा वाद निर्माण झालाय. अंनिसने अनेक सवाल उपस्थित करत असा दावा करणा-यांना प्रतिआव्हान दिलंय. ५ नेत्रहीनांची दृष्टी परत आल्यास २१ लाखांचं बक्षीस देऊ असं अंनिसनं सांगितलं आहे. तर अंधश्रद्धेला खतपाणी मिळणार नाही याची खबरदारी घ्यावी असं अंनिसने साई संस्थानकडे मागणी केली आहे.

याआधीही अनेकदा वेगवेगळे चमत्कार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. आता या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या दाव्याची वैज्ञानिक चौकशीची मागणी केली जातेय. मात्र शिर्डीत सध्या साईबाबांच्या दर्शनाने मुलाला दृष्टी परत मिळाल्याच्या दाव्याची जोरदार चर्चा सुरू आहे... सध्याच्या विज्ञानवादी युगात असे दावे करणं कितपत योग्य आहे हा खरा प्रश्न आहे.. संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनीही या दाव्याला दुजोरा देताना खरंच खातरजमा केलीय का ? याचा देखील विचार व्हायला हवा.

# नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही : राज्य निवडणूक आयोग

**मुंबई । प्रतिनिधी**

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतीही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेऊन व त्यावर स्वाक्षरी करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https:// mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून




त्याची मुद्रित प्रत (Print Out) काढून त्यावर उमेदवाराची स्वत:ची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयं घोषणापत्र, निवडणुकीसाठी बँक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जात प्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र- १' किंवा 'जोडपत्र- २' इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.

इच्छुक उमेदवारांना नोंदणीसाठी सुरुवातीपासून सुरू केलेले संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू असेल. तोपर्यंत त्यावर इच्छुक उमेदवारांना कोणत्याही वेळी नोंदणी करता येते व नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा लागतो. कारण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी ते आवश्यक असते. सही केलेल्या प्रिंटआऊटसह आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांचा संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र शनिवारी, १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा स्वीकारण्यात यावेत, अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, रविवारी (ता. १६) ते स्वीकारण्यात येणार नाहीत. इच्छुक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना देण्यात आले आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे.


**जाहीर प्रगटन**

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**

e-mail -tahsildar georai2@gmail.com

दिनांक ३०.१०.२०२५

दुरध्वनी क्र. ०२४४७-२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि-

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पो.स्टे चकलांबा

२. ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी

विषय: जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक जग्रनो२५२५/ ईऑ९९११८१)/ प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार सुधाकर सखाराम कहे रा. महारटाकळी यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार सुधाकर सखाराम कहे रा.महारटाकळी ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांची मूलगी राजकन्या सुधाकर कर्हे यांचा जन्म दिनांक १३.०७.२०२४ रोजी महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, गेवराई

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वात सुरेश आण्णा गवळी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

### उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेबांची ताकद पाठीशी, किल्लेधारूरात शिवसेनेचा भगवा नक्कीच फडकणार: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत, शिवसेना तालुका प्रमुख किल्लेधारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून किल्लेधारूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे प्रबळ दावेदार सुरेश आण्णा गवळी यांच्या समवेत किल्लेधारूर येथील नगरसेवक पदाचे प्रबळ दावेदार शौकेत शेरशहा इनामदार, दिलीप नवनाथ सिरसाट, बबलू सुधाकर सावंत, अशोक संभाजी शिंगारे, गीतांजली रघुनाथ पांचाळ, शेख नदीम, कृष्णा माणिक लोखंडे, लक्ष्मीबाई रमेश पारवे, तुषार औताडे, कृष्णा



गायके, अरुणा सुरेश जोगदंड, इरफान शेख, मुनाफ शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी दु. २.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे हा प्रवेश सोहळा पडला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपला भाषणात सांगितले की महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या कार्याला प्रभावित होऊन आपण शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहात आपल्या सर्वांचे मनः पूर्वक स्वागत करतो. उपमुख्यमंत्री नामदार शिंदे साहेब यांचे कार्य अवघ्या महाराष्ट्राने पाहिलेला आहे. यामुळेच महाराष्ट्रातल्या घरात आणि घरातील प्रत्येक मनात शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने आदर सन्मान मिळालेला आहे. शिवसेना पक्ष हा मालक नोकरांचा नसून ▶▶ उर्वरित पान २ वर

## ढेकणमोहा, जरुड, घाटसावळी येथे सर्व स्थानिक बस थांबाव्यात, बीड - वडवणी स्थानिक बस सुरु करावी : धनंजय गुंदेकर

### ● विद्यार्थी, युवकांसह रा. प. महामंडळ अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या एसी इलेक्ट्रिक बस ह्या ढेकणमोहा, घाटसावळी व जरुड या महत्वपूर्ण ठिकाणी थांबत नाहीत शिवाय बीड ते वडवणी स्थानिक बस सेवा सुरू करणे आवश्यक आहे.. तसेच बीड ते आंबेसावळी मण्यारवाडी



केसापुरी मुक्कामी गाडी बंद झालेली असू ती सुरू करण्यात यावी या व इतर मागण्यांसाठी शेतकरीपुत्र धनंजय गुंदेकर यांनी महामंडळ अधिकाऱ्यांची भेट घेतली..

बीड ते वडवणी ही बस सेवा सकाळी ०८ वाजता वडवणी येथून निघणे आवश्यक असून सायंकाळी बीड येथून ६ वाजता परत वडवणी दिशेने असावी. या बस सेवेची गरज ही विद्यार्थी, बीड येथे कार्यरत असलेले विविध शासकीय व गैरशासकीय अस्थापनातील कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक यांना आवश्यक आहे. या मार्गावर पांगर बावडी, मोची पिंपळगाव फाटा, राजुरी (वांगी) फाटा, शिवणी फाटा, जरुड फाटा, बाभळखुंटा फाटा, मौजवाडी फाटा, मौज, ब्रम्हगाव, ढेकणमोहा, श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी फाटा, बकरवाडी, घाटसावळी, पोखरी फाटा, मैंदा आदी ठिकाणे असून या बससेवेचा फायदा हा उपरोक्त गावांसह इतरही गावांना होणार आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## भाजपा ज्येष्ठ नेते मदनराव चव्हाण यांच्या कार्याचा हा सुंदर वारसा आहे



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या तहसील कार्यालया समोरचा फोटो आहे,सुंदर मदनराव चव्हाण हे नाव म्हणजे याच आवारात नेहमी लोकांची कामे करताना बघायला मिळत असत मग तहसील कार्यालय असो किंवा सिव्हिल हॉस्पिटल असो किंवा कोणतही प्रशासकीय कार्यालय असो जनतेसाठी २४ तास उभ असणार नाव हे सुंदर चव्हाण आहे,हा त्याच्या कार्याचा आणि समाजसेवेचा वारसा जो काही आहे तो वडील भाजपचे ज्येष्ठ नेते मदनराव चव्हाण यांचा आहे गोरगरीब जनतेच्या समस्या सोडवून प्रत्येकाच्या मनात एक विश्वास आणि आधार ▶▶ उर्वरित पान २ वर

## शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीच्या महिला रणरागिणींची आघाडी

**गेवराई । प्रतिनिधी**

सध्या गेवराई शहरांमध्ये नगर परिषद निवडणूकीचा प्रचार चांगलाच रंगात आलेला आहे. नगराध्यक्ष पदासाठी सौ. शितल महेश दाभाडे यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या महिला आघाडीच्या महिला रणरागिणी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरभर



प्रचार रॅली काढून मतदारांशी संपर्क करत आहेत. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या महिला आघाडीच्या विधानसभा क्षेत्राध्यक्ष सौ. मुक्ताताई आर्दड (मोटे) म्हणाल्या कि, १० वर्ष आमदार असताना लोकांची अवहेलना करणारे व लोकांनाच माझी गरज आहे असे म्हणणारे आता परत दारोदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड नगराध्यक्षपदासाठी खऱ्या मागासवर्गीय महिलेऐवजी मुस्लिम उमेदवारालाच संधी ?

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निर्णयावरून मागासवर्गीय समाजात संताप

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्ष पद राखीव ठरले आहे. मात्र, या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून केवळ कागदपत्रांवर अनुसूचित जातीची ओळख असलेल्या



महिलेला उमेदवारी देऊन प्रत्यक्षात मुस्लिम समाजातील व्यक्तीमार्फत राजकारण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

प्रेम कांबळे, अजय धनवे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड नगरपरिषद ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपयरत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपयरत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे. हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बॅकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा. जीवन प्रमाण या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने देखील हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिका–याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल. निवृत्ती वेतनधारक काही कामानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल.

### शिरूर पोलीसांची अवैध धंद्यांवर कारवाई



**शिरूर । प्रतिनिधी**

दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी अंदाजे ०६.३० वाजता शिरुर पोलीस ठाण्याचे कर्मचारी अवैध धंद्यांवर कारवाई करणेकामी पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, सिंदफणा नदीपात्रातून शिरापुर गाठ शिरुर कासार या गावाकडे एक इसम वाळूने भरलेला टॅक्टर घेऊन येत आहे. त्यानुसार पोलीस पथकाने सिंदफणा नदीपात्र परिसरात सापळा लावून कारवाई केली.

### नशा मुक्ती भारत सुधारणा व उपचार मोहिम

**बीड । प्रतिनिधी**

व्हिक्टिम शेल्टर या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेच्या वतीने, नशा मुक्त भारत सुधारणा व उपचार मोहिम अंतर्गत हा अभिनव उपक्रम संकल्प नशा मुक्ती केंद्र, एकता नगर, जालना रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉ. नामदेव चौहान (सामान्य सचिव, सीपीआय) होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मोमीन मुज़ाहिद (एडिशनल सिव्हिल सर्जन व मॅनेजिंग डायरेक्टर, ब्रेन केअर हेल्थ ग्रुप) उपस्थित होते. संजय शिंदे, संचालक, संकल्प नशामुक्ती केंद्र यांनी व्यसनमुक्तीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींविषयी मार्गदर्शन केले. मोमीन अकील (अध्यक्ष, व्हिक्टिम शेल्टर) यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमात इलियास इनामदार, कामरान खान, एहतिशाम, जावेद आणि शेख मोइनुद्दीन यांनी सामाजिक, धार्मिक व कायदेशीर दृष्टिकोनातून व्यसनाच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचा समारोप सुहैल यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. अध्यक्ष मोमीन अकील यांनी आगामी काळात आरोग्य, शिक्षण व सामाजिक सुधारणा क्षेत्रात अशाच उपक्रमांचे आयोजन करण्याची घोषणा केली.

### पावणेतीन लाख रूपयांची चोरी पाटबंधारे उपविभागाचे कर्मचारी १५ दिवसांनी पोलिस ठाण्याच्या दारी

**आष्टी । प्रतिनिधी**

जवळपास पावणेतीन लाख रूपये किंमतीचे शासकीय साहित्य चोरीला जाऊन पंधरा दिवसाचा कालावधी झाल्यानंतर शासकीय साहित्य चोरीला गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन एवढ्या दिवसांनी संबंधित विभागाला जाग आल्याने कार्यक्षेत्रात अधिकार्याचे किती लक्ष आहे.यावरून दिसून येत आहे. आष्टी तालुक्यातील पिंपळसुट्टी येथील कोल्हापूर बंधाऱ्याचे २ लाख ६४ हजार रूपये किंमतीचे ४० दरवाजे अज्ञात चोरट्यांनी २६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान चोरून नेल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी आष्टी येथील पाटबंधारे उपविभागाच्या महिला कर्मचारी कोमल पांडुरंग कांबळे याच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरटयांविरुद्ध कलम ३०३ हा चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार भाऊसाहेब आहेर तपास करीत आहेत.

## पाली जिल्हा परिषद च्या अनुषंगाने बप्पासाहेब घुगे यांची बोरफडी येथे बैठक संपन्न

### बप्पासाहेब घुगे यांना निवडून देण्याचा बोरफडी गावाचा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पाली जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत बोरफडी येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य बैठक संपन्न झाली. या बैठकीत बप्पासाहेब घुगे यांचा गेल्या निवडणुकीत थोड्या मताने पराभव झाला असला तरी या होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी करण्याचा ठाम निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.



बैठकीदरम्यान गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक वर्ग, तसेच महिलांनी ही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.बप्पासाहेब घुगे हे सर्वसामान्यांच्या सुखदुःखात कायम सहभागी राहणारे नेते असल्याने त्यांच्याविषयी जनतेत विशेष आत्मीयता आहे, असेही मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. ग्रामविकासाच्या दिशेने घुगे यांचे नेतृत्व सक्षम असून, ते जनतेच्या मनात घर करून आहेत, असे मत या बैठकीत मांडण्यात आले. शेवटी सर्व उपस्थित ग्रामस्थांनी बप्पासाहेब घुगे यांना निवडून देऊ, विकासाचा संकल्प पूर्ण करू असा नारा देत निवडणूक लढाईसाठी एकजूट दाखवली.

## बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम आणि आरोग्य विभागात "अतिरिक्त कामकाज"च्या गोंडस नावाखाली भरमसाठ प्रतिनियुक्त्या

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजितदादांना तक्रार : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम आणि आरोग्य विभागांमध्ये विभागप्रमुखांचा मनमानी कारभार सुरू असून, विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्तीऐवजी अतिरिक्त कामकाज या गोंडस शब्दाखाली आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच विभागात ठेवण्यात येत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ



महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री अजितदादा पवार यांना जिल्हाधिकारी बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे.

डॉ. ढवळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र, प्रतिनियुक्ती हा शब्द न वापरता 'अतिरिक्त कामकाज' या नावाखाली मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्त्या करून नियमांचा बेकायदेशीर पद्धतीने भंग केला जात आहे. काही विभागप्रमुख आपल्या आवडत्या कर्मचाऱ्यांना प्रशासकीय किंवा विनंती बदलीनंतरही त्याच विभागात ठेवत आहेत. हा प्रकार विशेषतः शिक्षण, ▶▶ उर्वरित पान २ वर

# रा.काँ.शरदचंद्र पवार पक्षाकडून 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न



### बीडमध्ये नगराध्यक्षपदासाठी एससी महिला नव्हे मुस्लिमच उमेदवार : केशव रत्नपारखे

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्षपद राखीव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून लोकसभा व विधानसभा निवडणुकीप्रमाणे पुन्हा एकदा बीड नगरपरिषद निवडणुकीत 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. एससी महिलेला नगराध्यक्ष पद राखीव असतानाही अप्रत्यक्षरीत्या मागासवर्गीय महिलेच्या आडून मुस्लिम व्यक्तीलाच प्रतिनिधित्व देण्याचा घाट घातला जात आहे, असा आरोप हिंदुत्ववादी संघटनांकडून केला जात आहे.

समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी पत्रकात म्हटले की, बीड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव आहे. या पदावर खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचारसरणी असलेल्या उमेदवाराला संधी मिळेल, अशी अपेक्षा समाजातून होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व बीडचे आमदार यांनी अप्रत्यक्षरीत्या मुस्लिम उमेदवाराला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये 'वोट जिहाद'च्या स्वरूपात काय घडले होते, हे आपण पाहिले आहे. त्याचीच पुनरावृत्ती बीड नगरपरिषद निवडणुकीत होताना दिसत आहे. त्यामुळे विकासाचे कोणतेही व्हिजन नसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा हा कुटील डाव जनतेने लक्षात घेण्याची वेळ आली ▶▶ उर्वरित पान २ वर